# मध्ययुगीन स्थापत्यकलेचे प्रतिनिधित्व म्हणून मुघल स्थापत्याचा अभ्यास

सिध्दी सचिन बनछोडे
कलाशाखा (द्वितीयवर्षे )
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर (स्वायत्त )

**गोषवारा–**

कालपरत्वे बदलणाऱ्या मानवी भावनांचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रूपात केलेले सादरीकरण म्हणजेच कला होय.मानवी मनोरंजन, सामाजिक विकास व सर्वसमावेशक सामाजिकीकरण प्राप्त करण्यासाठी कलेचा आविष्कार महत्त्वाचा आधारस्तंभ ठरत आहे.कलेचा विचार करत असताना कला सादरीकरणाच्या विभिन्न पद्धतींचा विचार करणे अनिवार्य ठरते . यामध्ये नृत्यकला ,संगीतकलाव स्थापत्यकला अशामूर्त-अमूर्तप्रकारांचासमावेश होतो.भारतीय स्थापत्यकलेचे नमुनेहे प्राचीन काळातील मौर्य साम्राज्यापासूनच पहावयास मिळतात.

स्थापत्यकला म्हणजे वास्तुकलेचा असा नमुना ज्यामध्ये सौंदर्यात्मक व उपयोगितावादी शिल्प कलांचा संग्रह केला जातो.तात्कालीन सामाजिक ,आर्थिक ,राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी स्थापत्यकला एक महत्त्वाची भूमिका बजावते.त्यामुळेच मुघल कालीन स्थापत्यकलेच्या माध्यमातून मध्ययुगीनभारताच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेणे शक्य होते.मुघल कालीन स्थापत्य कलेमुळे इतिहासातील अनेक अनुकूल व प्रतिकूल परिणामांचे अवलोकन करणे शक्य होते.मुघल कालीन स्थापत्य कलाहीसामाजिक जीवनातील मानवी वर्तणुकीचा व नीती शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी बजावतआहे.सद्यस्थितीतील सामाजिक व धार्मिक परंपरा, संस्कृती व चालीरीती यांच्यातील परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी स्थापत्यकला महत्त्वाचे योगदान प्रदान करते.त्यामुळेमध्ययुगीन स्थापत्यकलेचा अभ्यास करण्यासाठी मुघल स्थापत्य कलेचे महत्व निदर्शनास येते.तरी प्रस्तुत शोधनिबंधातूनआपण मुघल कालीन स्थापत्यकलेचा अभ्यास करणार आहोत.

**शीर्षशब्द–**

कला,सामाजिकीकरण, अविष्कार, नृत्यकला, संगीतकला व स्थापत्यकला.

**प्रस्तावना–**

प्राचीन काळाचा विचार करता ठाणेदार चा राजा हर्षवर्धन याच्या मृत्यूनंतर प्राचीन कालखंडाचा अंत होतो.इसवी सन 646 नंतर हर्षवर्धन साम्राज्याचेविविध भागांमध्ये विभागणी झाली आणि याचाच परिणाम म्हणजेच उत्तरेमध्ये गुर्जरप्रतीहार, दक्षिणेमध्ये राष्ट्रकूट व पूर्वेमध्ये पाल हे घराणे उदयास आले,परंतु तराई व चंदाहार येथे झालेल्या लढायांमुळे भारतीय सत्तेचा नाश होऊन इस्लामी सत्तेची स्थापना झाली.इसवीसन 1206 मध्येगुलाम वंशाच्या कुतुबुद्दीन ऐबक याने दिल्लीमध्ये सुलतान शाही चा पाया रचलाआणि त्यानंतर अल्तमश ,रजिया सुलतानवबलबनया उत्तराधिकाऱ्यांनीसुलतानशाहीचा वारसा हस्तांतरित केला.सुलतानशाहीमध्ये स्थापत्यकलेच्या अनेक उत्कृष्ट नमुन्यांचे दर्शन पहावयास मिळते जसे की,दिल्लीमधील
कुवत-उल-इस्लाम ही मज्जीद स्थापत्य कलेची उत्कृष्ट देणगी आहे.

याच काळामध्ये दक्षिण भारतामध्ये 12 व्या शतकाच्या प्रारंभीच देवगिरी येथे यादव घराणे उदयास आले.याच यादव घराण्याने द्रविड शैलीतील मंदिर स्थापत्यकलेत वैशिष्टपूर्ण शिल्प शैलीतूननाविन्य प्राप्त करून दिले.यामध्येराजा वल्लभीयांच्या कार्यकाळातील सोमनाथ मंदिर व त्याचबरोबरयादव घराण्यातील राजा रावल जयसलयांच्या कार्यकाळातील जैसलमेर किल्ला हा स्थापत्यकलेचा उत्कृष्ट प्रयोग म्हणून संबोधला जातो.

याच बरोबर दक्षिण भारतातील बहमनी साम्राज्य हे इसवीसन 1347 ते 1518 दरम्यान अल्लाउद्दीन बहमनशहा यांच्याकडून निर्माण झालेलेइस्लामिक साम्राज्य होते.त्यामुळेच येथे“इंडो-पर्शियन” या स्थापत्यकलेचे उत्कृष्ट दर्शन घडून येते.याच कारकीर्दीतगुलबर्गा किल्ल्याचा समावेश गुलबर्गा शहरात करण्यात आला.तसेच इसवीसन 1427 मध्येबिदर किल्ला हा 37 बुरुजांच्या

साह्यानेअबाधित ठेवण्यात आला आहे. आणि महमूद गावनयाबहमनीअभ्यासकानेमद्रास इमारतया धार्मिक व शैक्षणिक स्थापत्याचा समावेश बिदर शहरात केला. त्यानंतर दक्षिण भारतातील हरिहर या प्रशासकाद्वारे इसवी सन 1336 मध्ये विजयनगर या हिंदूसाम्राज्याची निर्मिती दक्षिणभारतातकरण्यातआली.

**मुघल कालीन राजकीय इतिहास**

मुघल कालीन राजकीय इतिहासाची माहिती मुख्यतः"तुझुक –ए-बाबरी","तारीख -इ-रशिदि","कानून-इ-हुमायूनी"व"अकबरनामा"या साहित्यकलेतून प्राप्त होते.मुघल सत्तेचा संस्थापक बाबर ते अंतिम उत्तराधिकारी औरंगजेब यांच्या कालखंडामध्ये मुघल साम्राज्यात अनेक धार्मिक ,सांस्कृतिक ,सामाजिक व आर्थिकइष्ट-अनिष्ट परिणाम घडून आले.या कालखंडामध्ये साहित्य, चित्रकला व स्थापत्यकलेचा विकास महत्वपूर्णठरला.मुघल सम्राटांनी कलेला दिलेल्या सर्वाधिक प्रोत्साहनामुळे अनेक सुंदरव कलात्मक स्थापत्यांची निर्मिती होणे शक्य झाले.

भारतीय व इराणी शैलीच्या मिश्रणामुळे मुघल कालीन स्थापत्य कलेला वैशिष्ट्यपूर्ण महत्व प्राप्त झाले .इतिहासकारहॅवेलयांच्या मते,"मुघल कलाही देशी व विदेशी शैलींचे मिश्रण होते".विशाल गोलाकार घुमट, उंच मिनार ,जाळीदार सुंदर नक्षीकाम, विशाल खुले प्रवेशद्वार, रंगीबेरंगी चित्रण,संगमरवरी व लालदगडांचा वापर व बाग-बगीचे हे मुघल कालीन स्थापत्य शैलीचे मुख्य वैशिष्ट्य मानले जाते.

**बाबरकालीनस्थापत्यकला**

बाबरच्या मतानुसार भारतीय स्थापत्यकला ही निकृष्ट व नियोजन विरहितआहे,भारतीय स्थापत्यकलेतील प्रसिद्ध तुर्की व अफगाणी शैली देखील बाबरच्या दृष्टीने सामान्य व पुरोगामी होती ,परंतुग्वालेर येथील मानसिंह आणिविक्रम अजितचे राजप्रासाद त्याला विशेष आकर्षित करायचे.बाबरने स्थापत्यकलेत वापरलेल्या निकृष्ट व सामान्य बांधकाम साहित्यामुळे शिल्प व वास्तु दीर्घकाळ अस्तित्वात राहू शकल्या नाहीत.या काळात बांधल्या गेलेल्या काबुली बाग ,रोहिलखंड व अयोध्येतील मशिदी देखील सामान्यशैलीनेनिर्माण झालेल्या होत्या.त्याने विहिरी ,कारंजे ,स्नानगृह, सरोवर वमंडप इत्यादी वास्तु निर्मितीकडे लक्ष केंद्रित केले.इतिहासकारांच्या मते,"बाबरने कॉन्स्टॅंटिनोपल येथूनसिनानवाच्या शिल्पकारालाआमंत्रित केले",परंतु या विधानावर अनेक मतमतांतरे पहावयास मिळतात.

**हुमायून कालीनस्थापत्यकला**

बाबरने केलेल्या साम्राज्य विस्ताराचा वारसा पुढे टिकवण्यासाठी हुमायूनचे बहुतांश आयुष्य हे युद्ध व धावपळीत गेले.त्यामुळे मुघल स्थापत्यकलेचा विकास करण्याची संधी हुमायूनला लाभली नाही.बलाढ्य अशा राजकीय, आर्थिक व सामाजिक वाटचालीमुळेसांस्कृतिकवारशाच्या जोपासणेकडे दुर्लक्ष झाले.हुमायून नेस्वतःच्या कारकिर्दीमध्ये दिल्ली येथे"दीनपनाह"या नावाचामहाल बांधलापरंतु अपुऱ्या व अल्प वेळेत केलेल्या बांधकाम कार्यामुळे या महालाचे सौंदर्य व अस्तित्व दीर्घ काळापर्यंत टिकवणे अशक्य बनले.हा महाल नंतरशेरशहा कडून उध्वस्त केला गेला असे इतिहासकारांचे मत आहे.हुमायूनने नंतरच्या काळात आग्रा व फत्तेबाद येथे दोन मशिदी निर्माण केल्या परंतु निकृष्ट दर्जाच्या बांधकाम शैलीमुळे याच्या मूर्त अस्तित्वाऐवजी फक्त अवशेष दिसून येतात.

**अकबर कालीनस्थापत्यकला**

मुगल कालीन स्थापत्यकलेला खऱ्या अर्थाने अकबराच्या आगमनानंतर सुवर्णयुग प्राप्त झाले कारण अकबराने मुघल स्थापत्यकलेमध्ये अनेक नवनवीन प्रयोग आत्मसात केले .अकबराने या काळात मोठ्या प्रमाणात वास्तू व शिल्पांची निर्मिती केली.अबुल फजल हा अकबरनाम्यातअकबराचे स्थापत्य कलेविषयी चे प्रेम व्यक्त करताना असे म्हणतो की,"शहेनशहा विशाल भावनांची योजना तयार करतात आणि स्वतःच्या बुद्धी व भावनांचा पाषाण आणि मातीच्या वस्त्रांनी सुशोभित करतात". अकबर कालीन वास्तूंवर हिंदू शैलीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.अकबर कालीन काही प्रसिद्ध मुघल वास्तु पुढीलप्रमाणे

***आग्र्याचा लाल किल्ला-***

या किल्ल्याच्या भिंती 70 फूट उंच असून किल्ल्याला प्रमुख दोन प्रवेशद्वार आहेत. त्यातील एक म्हणजे "अमरसिंहद्वार" व दुसरा म्हणजे "दिल्लीद्वार"होय.किल्ल्याच्या अवतीभवती खंदक असून किल्ल्यामध्ये पाचशेहून अधिक इमारती आहे.या किल्ल्याची

उभारणी ही इसवी1565 मध्ये कासीमखान यामुख्यशिल्पकाऱ्याच्या देखरेखीखाली झाली .या किल्ल्याच्या निर्मितीसाठी एकूण पंधरा वर्ष व 4000 मजुरांचे श्रम गरजेचे ठरले .किल्ल्याची उभारणी करण्यासाठी सुमारे 35 लक्ष रुपये खर्च आला.

***हुमायूनमकबरा-***

मकबरा याचा अर्थ कबर किंवा थडगे असा होतो. या मकबऱ्याची निर्मिती हीअकबरच्या सावत्र आई हाजी बेगम यांनी केलेली होती.मकबऱ्याच्याबांधकामालाइसवीसन1564 मध्ये सुरुवात होऊन हे बांधकाम 1565 मध्ये परिपूर्ण झाले .या स्थापत्याची निर्मिती इराणी शिल्पकार हियासयाच्या देखरेखीखाली झाली त्यामुळेच ही वास्तु इराणी शैलीने प्रभावित आहे.या मकबऱ्याची स्तुती करत असताना पर्सी ब्राऊन असे म्हणतो की," हुमायूनचा मकबरा म्हणजे भारतीय शिल्पकारांनी तयार केलेला पर्शियन नमुना होय".हा मकबरा चौरसाकृती असून प्रत्येक बाजूची लांबी ही 156 फूट इतकी आहे.

***जहांगीरमहाल-***

संपूर्णपणे लाल दगडांनी बांधलेला जहांगीर महाल हा 249 फूट लांब व 260 फूट रुंद आहेजहांगीर महालासमोर एका गवताच्या मैदानावर दगडी हौद असून याचा वापर मुख्यतः स्नानासाठी केला जात असावा असे इतिहासकारांचे मत आहे.हा हाऊद 5 फुट उंच ,25 फूट परीघ आणि 8 फूट व्यास असलेला आहे.

***फत्तेपूर सिक्री-***

आग्रा पासून 22 मैल अंतरावर असणाऱ्या एका पहाडी प्रदेशात फत्तेपूर सिक्री या नगराची उभारणी करण्यात आली.हे शहर शेख सलिम चिस्ती या सुफी संताच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारण्यात आले होते.ही वास्तू हिंदू व मुस्लिम स्थापत्यकलेच्याएकात्मिकरणाचेएक उत्तम उदाहरण म्हणून संबोधले जाते .फत्तेपूर सिक्री मध्ये "दिवान-ए-आम"व"दिवान-ए-खास"ही व्यवस्था पहावयास मिळतेत्याचबरोबर "जोधाबाई चा महाल"व"बिरबल चा महाल "देखील अस्तित्वात आहे.

**जहांगीर कालीनस्थापत्यकला**

जहांगीरने आपल्या कारकिर्दीमध्ये स्थापत्यापेक्षा उद्याने व चित्रकलेला जास्त महत्त्व प्राप्त करून दिले. त्यामुळे वास्तु बांधकामांचे प्रमाण जरी कमी असले तरी स्थापत्यकला ही उत्कृष्ट दर्जाची पहावयास मिळते.

***अकबरचामकबरा (सिकंदराबाद)-***

अकबरचा मकबरा हा आग्रायाशहरापासून 5 मैल अंतरावर असणाऱ्या सिकंदरा गावात आहे.मकबरा निर्मितीच्या कार्याचा प्रारंभ अकबराच्या कारकीर्दीत झाला व अकबरच्यामृत्यूनंतर जहांगीरने ही स्थापत्य निर्मिती परिपूर्ण केली.हे बांधकाम पूर्ण होण्यास सुमारे वीस वर्षांचा कालावधी लागला. हा मकबरा एका भव्य बगीच्या मध्यम स्थानी स्थित असून त्याची लांबी 339 फूट व रुंदी 100 फूट अशी आहे.त्याचबरोबरमकबऱ्याच्यासभोवताली 24 फुटउंचीचीअणकुचीदारखिळयांचीभिंतआहे.

***मरियमचीसमाधी-***

मकबऱ्याचे घुमट हे मोगल शैलीचे असून चारही बाजूंना सोडण्यात आलेले सज्जे अलंकारयुक्त कंसांनीसुशोभित आहेत.संपूर्ण इमारत ही लाल दगड व विटांपासून बनवलेली असून याची लांबी 145 फूट व उंची 39 फूट इतकी आहे.मकबऱ्याच्या चारी दिशांनी चार दरवाजे असून उत्तरेकडील द्वार हे मुख्य प्रवेशद्वार आहे.मकबऱ्याच्यावरच्या मजल्यावरील छत रुंद असून त्याच्या मधोमध संगमरवराचीकल्पित समाधी आहेत.

**शहाजहान कालीन स्थापत्य कला**

शहाजहानला वास्तुकला, चित्रकला व संगीतकलेची आवड होती.त्यामुळेचशहाजहानचे युग हे मुघल स्थापत्यकलेचे सुवर्णयुग म्हणून संबोधले जाते.डॉ.समर बहादुर सिंग यांच्या मते"भडकपणा व प्रदर्शनाची आवड असणाऱ्या या बादशाला आग्रा किल्ल्यातील लाल दगडांच्या इमारती अजिबात न आवडल्यामुळे त्याने अकबराने बांधलेल्या या इमारती एकेक करून पाडल्या व त्यांच्या जागी चमचम करणाऱ्या पांढऱ्याशुभ्र दगडांच्या इमारती बांधल्या ज्यामुळे त्याचे युग उजळून निघाले".

***ताजमहाल-***

आग्रा येथे यमुना नदीच्या किनाऱ्यावर स्थित असणारा ताजमहल हा मुघल कालीन स्थापत्यकलेचा एक अद्भुतप्रयोग आहे.इसवी सन 1631मध्ये सुरू झालेले बांधकाम 22 वर्षाच्या अथक परिश्रमातून इसवी सन 1653मध्ये पूर्ण झाले .या बांधकामावर

सुमारे 50 लक्ष रुपये खर्च आला.ताजमहालाचे वर्णन करत असताना पर्सी ब्राऊन असे म्हणतो की,"या वास्तूच्या निर्मितीचे मोजमाप मुसलमानांच्या हाती होते तर तिच्या सजावटीचे काम हिंदू कामगारांच्या हाती होते आणि यातील मुख्य घुमटाची रचना शैलीहीतयमुरशैली सारखी असली तरी अंततः ते हिंदु मंदिराच्या शिखराच्या सारखाबनलाआहे.ताजमहालाची रचना ही 22 फूट उंचीच्या चौकोनी चबुतऱ्यावर केली असून त्याची रुंदी 186 फूट इतकी आहे.चबुतराच्या चार कोपऱ्यात संगमरवराचे तीन मजली 137 फूट उंची मिनार असून ते शहाजहानच्यापवित्र प्रेमाचा चारही दिशांना जणू संदेश देत आहेत असे भासते.

***<u>शीशमहाल-</u>***

शीशमहाल हा सुवर्ण आणि मौल्यवान रंगीबिरंगी रत्नांनी अत्यंत आकर्षकरित्या निर्माण केलेला आहे .यात स्नानासाठी दोन कुंड असून त्यात कालव्याद्वारे पाणी भरले जात असे.दिवान-ए-खास च्या ठीक समोर दुसरा हॉल असून तो 75 फूट लांब आणि 15.5 फूट रुंद आहे.या दालनाच्या शेजारी टर्किश हमाम असून त्याला लागून असलेल्या कक्षात रंगीबिरंगी खड्ड्यांचे सुंदर नक्षीकाम करण्यात आले आहे.

***<u>आग्र्याची जामा मशीद-</u>***

शहाजान ची मुलगी जहाँआराने इसवी सन 1648 मध्ये या मशिदीच्या बांधकामांचे कार्य सुरू केले.ही मशीद 130 फूट लांब व 100 फूट रुंद आहे.लाल दगडांच्या साहाय्याने ही मशीद तीन भागांमध्ये विभागली गेली असून त्याच्या मध्यभागी तीन घुमट आहेत.या मशिदीच्या आतील भाग अत्यंत साधा असून तोभाग प्रार्थनेसाठीच बनवण्यात आलाहोता असे स्पष्टपणे दिसून आलेले आहे.

**<u>औरंगजेब कालीन स्थापत्य कला</u>**

औरंगजेबच्या कट्टर व पक्षपाती धोरणांमुळे मुघल कालीन स्थापत्यकलेचा खऱ्या अर्थाने अंत झाला.याचे वर्णन करत असताना इतिहासकार पर्सी ब्राऊन असे म्हणतात की,"मुघल स्थापत्यकलच्या विकासात मुघल सम्राटांचे योगदान फार मोठे होते, जोपर्यंत त्यांनी त्यात रुची घेतली तोपर्यंत स्थापत्यकलेची घौडदौड सुरू होती परंतु औरंगजेबाने या कलेप्रती उदासीनता दाखविताच ही दौड कुंठित झाली.इसवी सन  1689 मध्ये औरंगजेब ने औरंगाबाद येथे त्याची सर्वात प्रिय राणी रबिया दुर्राणी यांच्या स्मरणार्थ एक मकबरा बांधला जो दुसरा ताजमहल म्हणजेच "बीबी का मकबरा" या नावाने प्रसिद्ध आहे.औरंगजेब ने लाहोर येथे फिदाई खान यांच्या देखरेखीखाली "बादशाही मशीद"बांधली.त्याचबरोबर औरंगजेबाने काशी व मथुरा येथे देखील काही मशिदींचे स्थापत्य काम सुरू केलेअसले तरी औरंगजेब निर्मित वास्तु या कलाहीनता ,स्वच्छता व सजावटीचा दृष्टीचा अभाव आणि दर्जाहीन कामगिरीचे उत्तम नमुना आहे.

***<u>निष्कर्ष</u>***

वरील विश्लेषणावरूनआपणास हे लक्षात येते की,मुघल काळ हा स्थापत्यकलेच्या दृष्टीने एक सुवर्णयुग म्हणून उदयास आले,कारण याच कालावधीमध्ये"इंडो -पर्शियन"," इंडो-इराणी" व"इंडो- तुर्की" या नाविन्यपूर्ण स्थापत्य शैलींचा उदय झालाआणिहाउदय"बहुक्षेत्रीय स्थापत्य एकात्मिकरणास" चालना देणारा ठरलाआहे.मुघल स्थापत्यकलेच्या विकासामुळे सांस्कृतिकवकलात्मक भरभराटी तर झालीच पण त्याचबरोबर विविध आधुनिक व्यापारी केंद्रांची निर्मिती होऊन आर्थिक व व्यापारी भरभराटी ही झाली.उत्तर मुघलकालीन राजांच्या अकार्यक्षमतेमुळे जरी मुघल साम्राज्याचा ऱ्हास झाला असला तरीमुघल कालीन स्थापत्यकलेच्या देणगीने भारतीय संस्कृती आज देखील अजरामर आहे.

***<u>संदर्भ</u>***

मध्यकालीन भारताचा इतिहास - प्रा .मदन मार्डीकर

प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास -श्रीकांत प्रभाकर जाधव

www.wikipedia.com